बीड ■ वर्ष ६ ■ अंक ७१ ■ शुक्रवार, दि. १७ जुलै, २०२६ ■ पोस्टल दिनांक १८ जुलै, २०२६ ■ RNI : MAHMAR/2021/80738 ■ Postal No. LSB/Beed/RNP-211/2024-2026 ■ पाने ४ ■ किंमत २ रु.

BEED ■ Year-6 ■ Issue-71 ■ Friday 17 July, 2026 ■ Postal Date 18 July, 2026 ■ RNI : MAHMAR/2021/80738 ■ Postal No. LSB/Beed/RNP-211/2024-2026 ■ Pages 4 ■ Price 2

# पंकजाताई म्हणतात मी बीडची खरी पालक आहे; पण ताई लोकांनी गाऱ्हाणे सांगण्यासाठी तुम्हाला शोधायचे कुठे?

सायं.दैनिक
www.beedkisan.in
बीड किसान
• संपादक : शेख कामरान • BEED KISAN



## आईची माया दाईला येत नाही हे खरं पण लेकरांना वेळ देणारीही आई हवी!

**बीड । किसान न्युज**

**गेवराई येथील विकास कामांच्या उद्घाटन कार्यक्रमात बोलताना पंकजा मुंडे म्हणाल्या की, पालकमंत्री सुनेत्रा पवार असल्यातरी रक्ताचे नाते म्हणून मीच बीड जिल्ह्याची खरी पालक आहे. यात दुमत नाही. मात्र लोकांमध्ये अशीही चर्चा आहे की, पालक म्हणून तुमच्याकडे लोकांना गाऱ्हाणे मांडायचे असल्यास तुम्हाला शोधायचे कुठे असाही प्रश्न विचारला जात आहे. जर भेटण्यासाठी आले तरी तुमच्याकडे तेच ते लोकांचा गराडा तोडून येण्याचे म्हणजे मोठं दिव्य पार पाडल्या सारखे आहे. यामुळे तुम्हाला ही लोकांना वेळ देण्याचा नियम कटाक्षाने पाळावा लागेल हे ही तेवढंच महत्त्वाचं असल्याची जिल्ह्यात चर्चा सुरू आहे.**


अजितदादांच्या पश्चात सध्या बीडच्या पालकत्वाची जबाबदारी सुनेत्रा पवार यांच्याकडे आली आहे. दादांची पकड मजबूत असल्याने कोणीही भोलण्याची हिंमत करत नव्हतं मात्र यावरही चर्चा सुरू झाली आहे. याचे निमित्त ठरले गेवराई येथील विकास कामांच्या उद्घाटन सोहळा, या विकास कामांचे उद्घाटन राज्याच्या पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री पंकजा मुंडे यांच्या हस्ते करण्यात आले. या जाहीर कार्यक्रमात बोलताना पंकजा मुंडे यांनी मानातील गोष्ट बाहेर आणली असून त्यांनी बोलताना प्रशासकीय पालकमंत्री सुनेत्रा पवार या आहेत. मात्र जिल्ह्याशी असलेल्या रक्ताच्या नात्याने खरे पालकत्व माझ्याकडेच आहे. यामुळे मी जिल्ह्याच्या विकास कामांकडे नियमित नजर आहे. हा त्यांच्या बोलण्याचा रोख लोकांच्या लक्षात आला आहे. याची जोरदार चर्चा ही सुरू आहे. जिल्ह्याच्या विकासासाठी मातीतील पालकमंत्री असावा कारण आईची माया दाईला येत नाही हे प्रत्येकाला माहीत आहे. पण ताई तुम्ही कामेही जिल्ह्यासाठी आणताल हे खरं आहे. तसेच पालकत्व नसलं तरी तुम्ही आताही जिल्ह्याच्या विकासासाठी पुढाकार घेतला तरी कोणी रोखू शकत नाही. » पान २ वर

### फोनवर डायरेक्ट बोलणं होण हे नशीबच

**सध्या झालेल्या आधुनिक क्रांतीने जग अत्यंत जवळ आले असून, काही सेकंदात कोणाशीही संपर्क होतो. मात्र आजही सामान्य माणूस आणि पंकजा मुंडे यांचा संपर्क होतच नाही. लोकांना प्रत्येक कामासाठी त्यांच्या पीएंनाच बोलावं लागतं. एखाद्या व्यक्तीचं डायरेक्ट पंकजा मुंडे यांच्याशी बोलणे झाले तर त्याचे नशीबच म्हणायचे अशी परिस्थिती असल्याची चर्चा आहे.**

## सोनम वांगचुक उपोषणाच्या एकोणिसाव्या दिवशीही देश शांत

# शिक्षणासाठी लढणारा एकटा का पडला?




**देशात एखादा नेता जात, धर्म, पंथ किंवा राजकीय ध्रुवीकरणाच्या मुद्द्यावर आंदोलन करतो, तेव्हा त्याच्या सभोवताली कॅमेऱ्यांचा गराडा असतो. स्टुडिओतील चर्चा, ब्रेकिंग न्यूज आणि राजकीय प्रतिक्रिया यांचा अक्षरशः पाऊस पडतो. पण जेव्हा एखादा माणूस देशातील विद्यार्थ्यांच्या भविष्यासाठी, शिक्षण व्यवस्थेतील पारदर्शकतेसाठी आणि जबाबदारी निश्चित करण्यासाठी स्वतःचे जीवन पणाला लावून बेमुदत अन्नत्याग आंदोलन करतो, तेव्हा त्याच्याकडे पाहायलाही व्यवस्था तयार नसते. हा प्रश्न केवळ सोनम वांगचुक यांचा नाही; हा देशाच्या लोकशाहीचा, शिक्षण व्यवस्थेचा आणि समाजाच्या संवेदनशीलतेचा आहे.**



कामरान शेख
संपादक दै.किसान

### थेट! मुद्यावर

सोनम वांगचुक यांनी २८ जूनपासून दिल्लीतील जंतर-मंतर येथे बेमुदत उपोषण सुरू केले. आंदोलनाचा एकोणिसावा दिवस सुरू असताना त्यांचे नऊ किलोहून अधिक वजन घटल्याचे सांगितले जात आहे. प्रकृती खालावत असतानाही त्यांच्या मागण्यांवर केंद्र सरकारकडून कोणतीही ठोस भूमिका दिसून आलेली नाही. त्यांनी दोन प्रमुख मागण्या मांडल्या आहेत–नीट परीक्षा पेपरफुटी प्रकरणाची नैतिक जबाबदारी स्वीकारून केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी राजीनामा द्यावा आणि लडाखला राज्याचा दर्जा व सहाव्या अनुसूचीत संरक्षण द्यावे. शिक्षण हा केवळ अभ्यासक्रमाचा विषय नाही; तो देशाच्या भविष्याचा पाया आहे. लाखो विद्यार्थी वर्षानुवर्षे परिश्रम करून स्पर्धा परीक्षांची तयारी करतात. जर त्या परीक्षा पेपरफुटीमुळे संशयाच्या भोवऱ्यात अडकत असतील, तर विद्यार्थ्यांचा व्यवस्थेवरील विश्वासच उडतो. अशा परिस्थितीत जबाबदारी निश्चित व्हावी, दोषींवर कठोर कारवाई व्हावी आणि शिक्षण व्यवस्थेवर पुन्हा विश्वास निर्माण व्हावा, ही मागणी लोकशाहीत अस्वाभाविक मानता येणार नाही.

वांगचुक यांनी स्पष्ट शब्दांत सांगितले की, चाळीस वर्षे मी शिक्षणासाठी काम केले आहे. विद्यार्थी शिक्षण व्यवस्थेतील अन्यायाविरोधात आवाज उठवत असताना मी शांत राहू शकत नाही. ही भूमिका कोणत्याही राजकीय पक्षाची नसून शिक्षण क्षेत्रात आयुष्य घालवलेल्या व्यक्तीची आहे. त्यामुळे त्यांच्या आंदोलनाकडे केवळ राजकीय चष्म्यातून पाहणे योग्य ठरणार नाही. या आंदोलनातील आणखी एक चिंताजनक बाब म्हणजे त्याला मिळणारे अत्यल्प माध्यम कव्हरेज. सामाजिक माध्यमांवर काही व्हिडिओ आणि नागरिकांच्या पोस्ट वगळता मुख्य प्रवाहातील माध्यमांमध्ये या आंदोलनाची चर्चा अत्यंत मर्यादित दिसते. मात्र, माध्यमांच्या भूमिकेबाबत कोणतेही सर्वसाधारण निष्कर्ष काढण्यापूर्वी पुराव्यांवर आधारित मूल्यांकन करणे आवश्यक आहे. तरीही, शिक्षणासारख्या राष्ट्रीय प्रश्नावर व्यापक सार्वजनिक चर्चा अपेक्षित असताना ती दिसून न येणे, ही नक्कीच चिंतेची बाब आहे. लोकशाहीत सरकारवर टीका करणे हा विरोध नव्हे; ती लोकशाही मजबूत करण्याची प्रक्रिया आहे. एखाद्या आंदोलनाशी सहमत किंवा असहमत असणे हा प्रत्येकाचा अधिकार आहे. मात्र, आंदोलनकर्त्यांशी संवाद न साधणे, मागण्यांवर मौन बाळगणे किंवा प्रश्नांकडे दुर्लक्ष करणे, यामुळे असंतोष अधिक वाढतो. लोकशाहीची ताकद संवादात असते, मौनात नाही. आज प्रश्न सोनम वांगचुक यांचा नाही. प्रश्न आहे त्या लाखो विद्यार्थ्यांचा, ज्यांनी प्रामाणिकपणे अभ्यास केला आणि व्यवस्थेतील त्रुटींमुळे निराशा अनुभवली. प्रश्न आहे त्या पालकांचा, ज्यांनी मुलांच्या शिक्षणासाठी आयुष्याची कमाई खर्च केली. प्रश्न आहे त्या भारताचा, जो जगाला ज्ञानगुरू होण्याचे स्वप्न दाखवतो. सरकारने या आंदोलनाकडे राजकीय संघर्ष म्हणून नव्हे, तर लोकशाहीतून आलेल्या गंभीर इशाऱ्याप्रमाणे पाहण्याची गरज आहे. संवाद सुरू करणे, शिक्षण व्यवस्थेतील पारदर्शकतेबाबत ठोस पावले उचलणे आणि जनतेच्या प्रश्नांना उत्तर देणे, हीच जबाबदार शासनाची ओळख असते. कारण शेवटी इतिहास हा एवढाच प्रश्न विचारतो–देशात शिक्षण वाचवण्यासाठी एक माणूस उपोषणावर बसला होता; तेव्हा आपण कुठे होतो?

# मुस्कान प्रकरणी सखोल चौकशी करा : आ.पंडित

### संबंधित डॉक्टरांच्या बडतर्फीचा प्रस्ताव वरिष्ठांकडे पाठवणार : सीएस सोळंके





विजयसिंह शरदादेवी शिवाजीराव पंडित
विधानसभा सदस्य
२२८, गेवराई विधानसभा मतदार संघ

प्रति,
मा. जिल्हा शल्यचिकित्सक,
जिल्हा शासकीय रुग्णालय,
बीड.

विषय :- शेख मुस्कान मृत्यु प्रकरणाची चौकशी करून दोषींविरुद्ध कारवाई करणे बाबत.

महोदय,
मुस्कान सिद्दीकी शेख (वय २३) या जिल्हा शासकीय रुग्णालय, बीड येथे प्रसुतीसाठी दाखल झाल्या होत्या, प्रसुती दरम्यान रक्तस्त्राव झाल्यामुळे त्यांचा संशयास्पद मृत्यु झाल्याची तक्रार नातेवाईकांनी केली आहे. ... सदर घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन या बाबत तातडीने चौकशी करून दोषींविरुद्ध नियमाप्रमाणे कारवाई करावी, ही विनंती.

आपला,
विजयसिंह पंडित
(वि.स.स.)

प्रत :
मा.उपसंचालक,
आरोग्य सेवा, लातूर.

**बीड । किसान न्युज**

बीड जिल्हा रुग्णालयात उपचारादरम्यान मृत्यू झालेल्या मुस्कान शेख प्रकरणाने जिल्ह्यात मोठी खळबळ उडाली असून, मृत महिलेच्या नातेवाईकांनी गुरुवारी जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. सतीश कुमार सोळंके यांची भेट घेऊन न्यायाची मागणी केली. यासाठी आ विजयसिंह पंडित यांनी लेखी पत्र देऊन सखोल चौकशी करून दोषींवर कार्यवाही करण्याचे निर्देश दिले आहेत .यावेळी नातेवाईकांनी संपूर्ण घटनाक्रम मांडत उपचार प्रक्रियेत झालेल्या कथित निष्काळजीपणाबाबत तीव्र संताप व्यक्त केला.

नातेवाईकांनी स्त्रीरोगतज्ज्ञ डॉ. फरीदा, डॉ. स्नेहल मेंगडे, भूलतज्ज्ञ डॉ. पंडित, आयसीयूचे डॉ. शुभम मेनकुदळे, ओटी स्टाफ नीता लांभोरे तसेच उपचार प्रक्रियेत सहभागी असलेल्या इतर डॉक्टर, अधिकारी आणि कर्मचाऱ्यांच्या भूमिकेची सखोल चौकशी करण्याची मागणी केली. चौकशीत हलगर्जीपणा अथवा निष्काळजीपणा सिद्ध झाल्यास संबंधित सर्वांवर सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करून कठोर कायदेशीर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी नातेवाईकांनी केली. यावेळी » पान २ वर

# अल्पवयीन मुलीचे लग्न दोन महिन्यांनंतर गुन्हा दाखल

### आरोपींमध्ये पती, सासू,सासरा अन् मुलीच्या आई,वडीलासह नातेवाईकांचा समावेश

**केज । किसान न्युज**

शहरातील एका भागात राहणाऱ्या आणि केवळ आठवीच्या वर्गात शिक्षण घेणाऱ्या एका १७ वर्षांच्या मुलीचा दोन महिन्यांपूर्वी बळजबरीने बालविवाह लावून दिल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. या प्रकरणी पिडीत मुलीच्या छळाची दखल घेत मुंबई आणि केज पोलिसांनी संयुक्तपणे कारवाई केली आहे. पिडीतेचा छळ करणारे पती, तिचे सासू-सासरे आणि स्वतःचे जन्मदाते आई-वडील यांच्यासह इतर नातेवाईकांविरुद्ध केज पोलीस ठाण्यात बुधवारी, १५ जुलै रोजी रात्री ८:०० वाजता बालविवाह प्रतिबंधक कायदा आणि पोक्सो कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पिडीत मुलगी




अल्पवयीन आहे हे स्पष्ट माहिती असताना देखील तिच्या नातेवाईकांनी ९ मे २०२६ रोजी दुपारी १२ वाजून १२ मिनिटांनी केज येथे हा बालविवाह लावून दिला होता. लग्न करून » पान २ वर

# मान्सून सक्रिय होणार; पुढील आठवड्यात जोरदार पावसाचा इशारा

**मुंबई । किसान न्युज**

गेल्या काही दिवसांपासून विश्रांती घेतलेला मान्सून राज्यात पुन्हा जोरदार सक्रिय होण्याची शक्यता आहे. हवेत वाढलेले बाष्प आणि बंगालच्या उपसागरात निर्माण झालेली अनुकूल परिस्थिती यामुळे त्याचा जोर वाढणार आहे. हवामान अभ्यासक अश्रेय शेट्टी यांनी दिलेल्या माहितीनुसार, जुलै महिन्याच्या उत्तरार्धात संपूर्ण राज्यभरात चांगल्या पावसाची शक्यता आहे. हवेतील बाष्पाचे वाढलेले प्रमाण आणि बंगालच्या उपसागरात तयार झालेल्या कमी दाबाच्या क्षेत्रामुळे विदर्भ आणि उत्तर कोकणातील काही भागात गुरुवारी पावसाने चांगली हजेरी लावली. या वातावरणीय बदलांमुळे राज्यात पावसासाठी पूरक परिस्थिती तयार होत आहे. सध्या राज्यात पाऊस कमी झाल्याने शेतकरीवर्गात चिंतेचे वातावरण आहे. त्यामुळे जोरदार पावसाची वाट पाहिली जात आहे. आता पाऊस आल्यास दिलासा मिळेल.

स्थानिक सोने चांदीचे भाव..

पंकज ज्वेलर्स
पिंगळे गल्ली, कारंजा रोड, बीड
✆ 9850643058

सोने २४ कॅरेट
140,800
२२ कॅरेट
131,000
चांदी प्रतिकिलो
222,000

# अल्पवयीन मुलीची भर बाजारात काढली छेड!

### जाब विचारणाऱ्या मामाचे फोडले डोके; चौघांवर गुन्हा

**बीड । किसान न्युज**

कुटुंबासह आठवडी बाजारला आलेल्या अल्पवयीन मुलीचा पाठलाग करुन भर बाजारात छेड काढली याबाबत जाब विचारणाऱ्या पीडितेच्या मामाला मारहाण करुन डोकं फोडून जखमी केल्याची घटना पाचेगाव (ता.गेवराई) येथे घडली. याप्रकरणी चौघांवर ट्रॉसिटीसह, पोक्सो कायद्यानुसार गेवराई पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. गेवराई तालुक्यातील पाचेगाव येथे गुरुवारी (दि.१६) एका गावातील १६ वर्षीय मुलगी कुटुंबातील काही जणांसोबत बाजारासाठी आली होती. यावेळी चार जणांनी पाठला करीत भर बाजारात हात पकडून व लज्जा वाटेल असे कृत्य केले. यानंतर मुलीने हाताला झटका देऊन सुटका करुन घेतली आणि गावाकडे जाणाऱ्या रिक्षाजवळ आत्या आणि मामा थांबलेले होते. तिथे थांबली तेथून नंतर ते रिक्षात गावाकडे जाताना पुन्हा ते चौघे दुचाकीवरून आले आणि पुन्हा छेडछाड केली. यानंतर पीडितेचे मामा यांनी खाली उतरून का छेडता म्हणून जाब विचारला असता आरोपींनी डोक्यात काठी मारुन जखमी केले. तसेच धुसऱ्या दोघांनी हातात दगड घेऊन शिवीगाळ करीत जीवे मारण्याची धमकी दिली. याप्रकरणी पीडितेने दिलेल्या फिर्यादीवरून गेवराई पोलीस ठाण्यात आरोपी अमर संतराम पवार, अजय पावर आणि दोन अनोळखी असे चौघांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला. या गुन्ह्याचा तपास पोलीस उपाधीक्षक करीत आहेत.

# तहसीलदार,मंडळ अधिकाऱ्यांचा आरक्षित जागा भुमाफियाच्या घशात घालण्याचा प्लॅन.?

### प्रिया डोईफोडे यांचा आरोप

**बीड । किसान न्युज**

**मौजे बीड (पिंगळे), गट क्रमांक १८८ हा नगर परिषद, बीड हद्दीतील भूखंड असून विकास आराखड्यानुसार त्यावर Play Ground d MHADA असे सार्वजनिक आरक्षण आहे. अशा आरक्षित जागेवर काही व्यक्तींनी बनावट गुंठेवारी प्रमाणपत्रांचा वापर करून खरेदीखते नोंदवून महसूल अभिलेखात फेरफार करण्याचा प्रयत्न केला आहे.**







या संदर्भात मी यापूर्वी नगर परिषद, तहसील कार्यालय व नोंदणी कार्यालयाकडे लेखी तक्रारी दिलेल्या आहेत. नगर परिषद, बीड यांनी दिनांक ०७/०४/२०२५ च्या पत्राद्वारे संबंधित गुंठेवारी प्रमाणपत्रे बनावट असल्याचे स्पष्ट नमूद केले आहे आणि अशा कागदपत्रांवर कोणतीही नोंद घेऊ नये, असे संबंधित अधिकाऱ्यांना कळविले आहे.परंतु चुकीच्या पद्धतीने न. प. बीड कढून नवीन दिशाभूल व गोल गोल पत्र घेऊन आरक्षणाचे अधिग्रहण व सीमाकांन झाले नसल्याने फेरफार घेण्यात येत आहे असे चुकीच्या पद्धतीने फेर मंजुरीसाठी भरले आहे याउलट वरील जमिनीचे सीमाकांन व अधिग्रहण तेव्हाच झाले आहे यापूर्वी संबंधित फेरफार » पान २ वर



**भक्ती कंट्रक्शन एकनाथ नगर तीस घर कॉलनी बीड येथे लाईटच्या तारा रोड पासून अवघ्या दहा फुट अंतरावर खाली लोंबत आहेत पुढील धोका टाळण्यासाठी एम एस सी बी ने तात्काळ दखल घ्यावी.**